आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ एप्रिल २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात आज तुरळक अपवाद वगळता शांततेत मतदान
- पहिल्या टप्प्यात ६२ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याचा अंदाज / त्रिपुरामधे सर्वात जास्त ८० टक्के मतदानाची नोंद
- महाराष्ट्रातल्या ५ लोकसभा मतदारसंघात संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सरासरी ५४ पूर्णांक ८५ शतांश टक्के मतदान
- विकासाला मत देत महायुतीच्या उमेदवारांना निवडून देण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं वर्धा इथं प्रचारसभेत आवाहन

  **आणि**
- सुरुवातीच्या घसरणीवर मात करत दिवसअखेर देशातल्या शेअर बाजारात मोठी तेजी

**<><><><><>**

अठराव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात आज तुरळक अपवाद वगळता शांततेत मतदान झालं. २१ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या १०२ लोकसभा मतदारसंघांमधे १हजार ६२५ उमेदवारांचं भवितव्य मतदार यंत्रात नोंदलं गेलं. पहिल्या टप्प्यात अंदाजे ६२ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. प्राथमिक अंदाजानुसार सर्वात जास्त मतदान त्रिपुरामधे जवळजवळ ८० टक्के इतकं नोंदलं गेलं.

पश्चिम बंगालमधे ७७ टक्के तर तमिळनाडूत ६२ टक्के मतदान झालं. उत्तराखंडमधे सुमारे ५४ टक्के मतदारांनी आपली पसंती मतदारयंत्रात नोंदवली. उत्तरप्रदेशात ५७ टक्क्याहून जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. महाराष्ट्रात ५५ टक्के मतदान झालं. छत्तीसगडमधे ६३ टक्के तर बिहारमधे ४७ टक्के मतांची नोंद यंत्रात झाली. आसाममधे ७१ टक्के, सिक्कीममधे सुमारे ६८टक्के तर अरुणाचल प्रदेशात६५ टक्के मतदान झालं. मेघालयात ७० टक्के, मणिपूरमधे ६८ टक्के, नागालँडमधे ५६ तर मिझोरममधे ५३ टक्के मतदान झालं. केंद्रशासित प्रदेशांपैकी अंदमान निकोबार बेटांवर ५७ टक्के तर लक्षद्वीपमधे एकोणसाठ टक्के मतदान झालं. पुद्दुचेरीत ७३ टक्के तर जम्मू काश्मीरमधे ६५ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे.

अरुणाचल प्रदेश आणि सिक्किम विधानसभा निवडणुकीसाठी देखील आज मतदान झालं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या ५ लोकसभा मतदारसंघात प्राथमिक आकडेवारीनुसार ५५ पूर्णांक ३५ शतांश टक्के मतदान झालं. सर्वाधिक सुमारे ६६ टक्क्यांहून अधिक मतदान गडचिरोली-चिमूरमध्ये झालं. त्यानंतर भंडारा-गोंदियात सुमारे ५७ टक्के, चंद्रपूरमध्ये ५५ टक्क्यांहून अधिक, रामटेकमध्ये ५२ पूर्णांक ३८ शतांश टक्के आणि नागपुरात ४९ टक्यांहून अधिक मतदान झालं. निवडणूक आयोगामार्फत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाले असले तरी मात्र गेल्या वेळेच्या तुलनेत मतदानाच्या टक्केवारीत घट झाल्याचं दिसून येतंय.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत रामटेकमध्ये ६२ पूर्णांक ७ शतांश, नागपूरमध्ये ५२ पूर्णांक ७ दशांश, भंडारा गोंदियात ६८ पूर्णांक ३१ शतांश, चंद्रपूरमध्ये ६४ पूर्णांक ६५ शतांश आणि गडचिरोली-चिमूरमध्ये सर्वाधिक ७१ पूर्णांक ९८ शतांश टक्के मतदान झालं होतं.

नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, विकास ठाकरे, सुनिल मेंढे, प्रशांत पडोळे, संजय कुंभलकर, नामदेव किरसान, राजू पारवे, चंद्रशेखर बावनकुळे, हंसराज अहिर, विजय वडेट्टीवार, सरसंघचालक मोहन भागवत, विलास मुत्तेमवार, धर्मरावबाबा आत्राम, डॉ.देवराव होळी, कृष्णा गजबे यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला.

गडचिरोलीतल्या काही दुर्गम मतदान केंद्रांवर दुपारी ३ पर्यंतच मतदान असल्यानं तिथल्या कर्मचाऱ्यांना आणि मतदान यंत्रांना हेलिकॉप्टरनं गडचिरोलीत आणायची सुरुवात झाली आहे.

या टप्प्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह एकूण ९७ उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद झालं.

**<><><><><>**

राज्यातल्या आजच्या मतदानाचा आढावा घेणारा ‘मतदानाचा मागोवा’ हा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागातर्फे आज सादर करण्यात येणार आहे. या बातमीपत्रानंतर आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

तिसऱ्या टप्प्यातल्या १२ राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशातल्या ९४ लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरायची मुदत आज संपली. महाराष्ट्रातल्या **रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि हातकणंगले** या ११ मतदारसंघात या टप्प्यात ७ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघात उद्या अर्जांची छाननी होईल, सोमवारपर्यंत अर्ज मागे घेता येतील. या टप्प्यात नारायण राणे, विनायक राऊत, सुनील तटकरे, अनंत गीते, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, प्रणिती शिंदे, उदयनराजे भोसले, छत्रपती शाहू महाराज यांच्यासारखे प्रमुख उमेदवार या टप्प्यात उमेदवारी रिंगणात आहेत.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात आज नारायण राणे यांनी उमेदवारी अर्ज भरला. यावेळी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उदय सामंत, रवींद्र चव्हाण, दीपक केसरकर यांच्यासह भाजपा आणि शिवसेनेचे अनेक नेते उपस्थित होते. अशिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि विद्यमान खासदार विनायक राऊत यांनी आज पुन्हा एक अर्ज सादर केला. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार अर्चना पाटील यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. या मतदारसंघात अखेरच्या दिवशी छत्तीस जणांनी ५० उमेदवारी अर्ज दाखल केल्याची प्राथमिक माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनानं दिली आहे.

सांगलीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. लातूरमध्ये काँग्रेस उमेदवार शिवाजी काळगे यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. रायगड लोकसभा मतदार संघात आज १९

उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनंत गीते यांच्यासह एकूण २८ उमेदवारांनी ४० अर्ज भरले आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व मतदारांनी विकासाला मत देत महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्यावं असं आवाहन प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज केलं. वर्धा जिल्ह्यातल्या तळेगावमध्ये भाजपाचे वर्ध्याचे उमेदवार रामदास तडस आणि अमरावतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते.

गेल्या १० वर्षात केंद्र सरकारनं केलेल्या कार्याचा आढावा त्यांनी घेतला. तसंच वर्धा आणि अमरावतीमध्ये झालेल्या विकासकामांची माहिती दिली. त्यात अमरावतीतला वस्त्रोद्योग पार्क, वर्धा-नांदेड रेल्वे मार्ग, सिंदीमधलं ड्रायपोर्ट यासह विविध विकास कामांचा समावेश होता. विरोधकांनी विदर्भाच्या विकासाकडे दुर्लक्ष केला. विरोधकांकडे विरोध करायला मुद्दाच नसल्यानं ते अपशब्द वापरणं आणि देशाला बदनाम करण्याचं राजकारण करत असल्याचा आरोप मोदी यांनी केला.

**<><><><><>**

गांधीनगर मतदारसंघात खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मतदार आहेत. शिवाय लालकृष्ण अडवाणी, अटल बिजारी वाजपेयी यांनी या मतदारसंघाचे नेतृत्व केलं आहे. मी गेली 30 वर्षे या मतदारसंघातून आमदार आणि खासदार राहिलो आहे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे, असं गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते

आज गांधी नगर लोकसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बातमीदारांशी बोलताना ते म्हणाले.या निवडणुकीत नरेंद्र मोदी यांना प्रचंड बहुमताने तिसऱ्यांदा प्रधानमंत्री  करण्यासाठी संपूर्ण देश उत्सुक आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला देशाची राज्यघटना बदलायची आहे, म्हणून त्यांनी लोकसभेच्या चारशेहून अधिक जागांचं उद्दिष्ट ठेवलं आहे, असा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज केला. ते आज बिहार मधल्या कटिहार इथं आयोजित एका प्रचार सभेत बोलत होते. भाजपा तपास यंत्रणांचा गैरवापर करत असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**<><><><><>**

व्यवहार सुरू झाले तेव्हा घसरलेले देशातले शेअर बाजार दिवसअखेर चांगली तेजी नोंदवून बंद झाले. दिवसअखेर सेन्सेक्स ५९९ अंकांची तेजी नोंदवून ७३ हजार ८८ अंकांवर बंद झाला. निफ्टी १५१ अंकांची तेजी नोंदवून २२ हजार १४७ अंकांवर स्थिरावला. सेन्सेक्सची दिवसभरातली किमान आणि कमाल पातळीत सुमारे चौदाशे अंकांचा आणि निफ्टीतल्या किमान आणि कमाल पातळीत ४०० अंकांचा फरक होता.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौमधे, लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या नवव्या षटकात ३ बाद ६८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

आयआयटी मुंबईचे नवे संचालक म्हणून ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक शिरिष केदारे यांची नियुक्ती झाली आहे. येत्या ६ मे रोजी ते पदभार स्विकारतील, असं आयआयटी मुंबईनं समाजमाध्यमाद्वारे जाहीर केलं आहे.

**//<><><><><>//**